[redacted]

4423 Marathi II

136933

Subject Code	H-4423
Subject	Marathi
Date	14/02/2025

Supplements attached

Main Answer Book		No. of Supplements		Total
1	+	0	=	1

Specific remarks of centre conductor regarding malpractices (in Red Ink)

- Mobile Phones and other electronic gadgets are strictly prohibited inside the examination hall.
- Use of non-programmable calculator is allowed ONLY in some subjects.
- Writing in any form on the Hollow craft sticker and Bar code sticker is strictly prohibited.
- Only blue ink/hall pen is to ben used for writing the answers. Black lead pencil may be used for drawing figures, diagrams and graphs. Use of any other Colour pencil/pen is strictly prohibited.
- Disclosing of identity on the answer book (except in the space provided) in any form is strictly prohibited.
- Candidate should check that the printed seat number is correct and verify that the answer book has all pages serial numbered before filling all other details.

9/220000/2025/SSC-HSSC

Pg No	Examiner	Moderator	Chief Moderator
03	12	12	
04 & 05	13	13	
06 & 07	16	16	
08 & 09	18½	18.5	
10 & 11	05	05	
12 & 13	04½	04.5	
14 & 15	09½	09	
16 & 17	–		
18	–		
Supp. 1	–		
Supp. 2	–		
Supp. 3	–		
Supp. 4	–		
Supp. 5	–		
Supp. 6	–		
TOTAL	78½ = 79	78	
Total in words	Seventy Nine	Seventy eight	

[redacted]

MARKS	E	M	CM
Pg. 03	12	12	—

Q. No.

विभाग - १

0 1. माता - मातृत्व

0 2. भीषण - भीषणता

0 3. पोरका - पोरकेपणा

0 4. कष्ट - कष्टाळू

0 5. सुगंध - सुगंधित

0 6. प्रेम - प्रेमळ

0 7. भाग्यहीन x भाग्यवंत

0 8. आनंद x दुःख

0 9. विश्वास x अविश्वास

0 10 देव - देवी

0 11 गाय - बैल

0 12. शेजारी - शेजारीण

Q. No.

01 13. भाकरी - भाकऱ्या

01 14. शेळ्या - शेळी

01 15 मंदिरे - मंदिर

01 16. माझ्या - सर्वनाम
01 शेतीजवळ - शब्दयोगी अव्यय
01 आलो - क्रियापद
01 आणि - उभयान्वयी अव्यय

MARKS	E	M	CM
Pg. 04 & 05	13	13	✓

Q. No.

विभाग 2

17. 'यत्नदेवाची उपासना' या पाठात सांगितलेली तीन प्रकारची माणसे खेतखाऊ, मैंसमंगळू आणि कष्टाळू आहेत.

18 लेखक दिवाकर यांना 'नाट्यछटा' या वाङ्मयप्रकाराने प्रतिष्ठा मिळवून दिली.

19 श्यामला मुले बालकवी म्हणून हाक मारीत असत.

20 आईने दळून ठेवलेले पीठ यमुनाबाईच्या घरी पोचवितो आणि तसाच माधुकरी मागून मी लवकरच परत येतो.

21. 'श्री मंगेश' च्या उग्र तरी मायाळू वाटणाऱ्या चित्राप्रमाणे गांधीजींची ती तसबीर देवस्वरूप वाटायची.

22 आपण द्विवेदी नाही, त्रिवेदी नाही, चतुर्वेदी नाही आपण सारेजण) अद्वेद असतो.

Q. No.

23. संदर्भ : वरील वाक्य वि.स. खांडेकर यांचा मोत्यांचे पिक या पाठातुन घेण्यात आले आहे. हे वाक्य कारभारणीने पाणबुड्यांना उद्देशुन म्हटले आहे.

स्पष्टीकरण : पाणबुड्यांचा प्रार्थनेमुळे सर्व नक्षत्र कोरडी जाऊन फक्त मोती निर्माण करणारा स्वाती नक्षत्रातला पाऊस पडला. पण त्या पावसाचा शेतीसाठी काही उपयोग होत नाही. घरातील अन्न संपल्यामुळे पाणबुडे अन्नाच्या शोधात गावाकडे जातात. गावच्या सीमेवर झोपडीबाहेर त्यांना कारभारीण उभी दिसते. त्या कारभारणीला मोत्यांचे रास दाखवून अन्नाची अपेक्षा बाळगतात. मुठभर मोती साठी ती मोहित होते पण पाणबुड्यांचा डोळ्यात कसलीतरी अतृप्ती थैमान घालीत असल्याचे दिसताच वरील वाक्य उच्चारते. पाणबुडे आम्ही तुझे भाऊ आहोत भाऊबिजेची ओवाळणी म्हणून हे मोती ठेव व खायला दे असं सांगतात. तेव्हा कारभारीण वरील वाक्य उच्चारते.

05

२४ डॉ रघुनाथ माशेलकर सॅनफर्ड विद्यापीठात ~~विख्यात~~ व्याख्याता म्हणून काम करीत होते. तेव्हा तेथे 'कौंसिल ऑफ सायंटिफिक ॲन्ड इंडस्ट्रियल रिसर्च' ~~चे~~ या भारताच्या सर्वोच्च संस्थेचे डायरेक्टर जनरल डॉ नायुडम्मा तेथे आले. डॉ नायुडम्मा यांनी भारतीय वैज्ञानिकांची बैठक बोलावली व नव्या भारताचे स्वप्न काय आहे ते रेखाटले. हे स्वप्न पुर्ण करण्यासाठी आपण सगळ्यांनी एकत्र यावे असे अव्हान त्यांनी दिले. त्यांचा या अव्हानांचा लेखकावर इतका परिणाम झाली की त्यांनी त्याच क्षणी भारतात परत जायचे ठरवले. त्यांनी आपल्या पत्नीला सांगितले की आपल्याला आपले राष्ट्र बोलावीत आहे आणि त्याप्रमाणे आपण भारतात परत येणार. असा जादूचा दिवस रघुनाथ माशेलकर यांचा आयुष्यात उगवला.

05

MARKS	E	M	CM
Pg. 06 & 07	16	16	

Q. No.

विभाग ३

25 संत एकनाथ महाराजांच्या गुरूचे नाव गुरू जनार्दन स्वामी असे आहे. 01

26 'सागरा प्राण तळमळला' या कवितेतील एकाच आचमनात समुद्र प्राशन करणाऱ्या ऋषीचे नाव अगस्ति असे आहे. 01

27 कवी बा. भ. बोरकरांच्या मते संकटांवर मात करून ध्येयाकडे वाटचाल करणारी पावले असावीत. 01

28 संतांच्या संगतीने समज। ध्यानि आणुनि पुरते उमजा॥ 01

29 शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतीवादी झुंजते। 01

30 गुंतलेले प्राण ह्या रानात माझे. 01

31. संदर्भ : वरील चरण संत नामदेव यांचा 'चक्रवाक पक्षी' या अभंगातुन घेण्यात आले आहे. पाणी व मासा यांचा उदाहरणातुन आपली तळमळता विठ्ठलभेटीसाठी व्यक्त केली आहे.

स्पष्टीकरण : विठ्ठलभक्तीसाठी व्याकुळ झालेले संत नामदेव आपल्या मनाची अवस्था पाणी व मासा यांचा उदाहरणातुन व्यक्त करीत आहे. माशांसाठी पाणी म्हणजे जीवन आहे त्याला पाण्यातुन काढले तर तो तळमळू लागतो. त्याचे प्राण तडपडते. पुन्हा पाण्यात जाण्यासाठी तो तळमळू लागतो. त्याच प्रमाणे संत नामदेव म्हणतात की तु मला दर्शन कधी देणार. या माश्यांसारखा माझा जीव तडपडतो आहे. तुझ्या भेटीशिवाय या मनाला शांतता भेटणार नाही. तु दिलेल्या मनुषी रूपाचे सार्थक करण्यासाठी

Q. No.

31. तुझे दर्शन अनिवार्य आहे, तु मला दर्शन दे

05

32. कवी मंगेश पाडगावकरांनी 'सांगा कसं जगायचं' या कवितेत हसत, खेळत, प्रसन्नपणे जीवन जगण्यातच मौज आहे असा विधायक दृष्टिकोण व्यक्त केला आहे. आयुष्य कसे जगावे हे आपल्या हातात असतं. हसत, खेळत जगलो तर आयुष्य वाढत जाणार. आणि रडत, रडत जगलो तर कमी होणार. अनेकवेळा आपल्याजवळ जे नाही याचा विचार करीत जगतो. पण त्यापेक्षा आपल्या जवळ जे आहे त्यात आनंद घेत जगलं पाहिजे. आपली वाट पाहणारी, दोन वेळचं जेवण वाढणारी लोकं असताना नशिबाला कोसणं व्यर्थ आहे. कवीच्या मते आहे त्यात समाधान मानुन हसत, खेळत, आनंदात जगण्यातच खरी मौज आहे.

04

MARKS	E	M	CM
Pg. 08 & 09	18½	18.5	—

Q. No.

विभाग ५.

0 ३३. नाकाने कांदे सोलणे – शिष्टपणा दाखवणे

0 ३४. पोट धरून हसणे – मोठ्याने हसणे

0 ३५. मोडीत होणे – स्वस्तात होणे

0 ३६. हुज्जत घालणे – वाद घालणे

0 ३७. व्यसनाच्या सेवनाने जीवनातील दुःख, ताण व नैराश्य दूर होतं अशी खोटी सबब दिली जाते.

३८. मित्रांच्या दबावामुळे, आग्रहाखातर, चुकीच्या कल्पनेमुळे, फक स्टाईल, थ्रिल, मौजमजा, जोश, जगावेगळं काहीतरी करण्याचा विचार अशा अनेक कारणांसाठी आजचा युवक व्यसनाकडे वळत आहे. 02

३९. युवकांनी आपल्या जीवनातील नैराश्य घालवण्यासाठी आपल्या अंगी असलेल्या छंदाचा व्यासंग बाळगावा, विविध खेळ खेळले पाहिजे, वाचन केले पाहिजे, व्यायाम करून, चांगले मित्र जोडून व सामाजिक जीवनात कार्यरत राहून नैराश्य घालवण्यासाठी प्रयत्न करावा.. 02

Q. No.

40.

प्रेरणा उच्च माध्यमिक विद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उद्घाटन सोहळा संपन्न

प्रेरणा उच्च माध्यमिक विद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाचे उद्घाटन सोहळा दिनांक २० जानेवरी 2025 रोजी मोठ्या उत्साहात संपन्न. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे शिक्षणमंत्री श्री ... व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच शाळेचे अध्यक्ष श्री ..., पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री ... व प्राचार्य सौ ... हेखील व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीतांनी झाले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा हस्ते दीपप्रज्वलन करून, सरस्वतीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिक्षक श्री .. ने स्वागत व प्रास्ताविक केले तसेच शिक्षिका सौं ... ने प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत त्यांना पुष्पगुच्छ प्रदान केले. या नंतर प्रमुख पाहुण्यांचा हस्ते सर्व विद्यार्थ्यांना बॅज प्रदान केले. आणि विद्यार्थ्यांनी आपल्याला कर्तव्याची आणि जबाबदारीची शपथ घेतली.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातुन विद्यार्थ्यांना त्यांचा कर्तव्याची जाणीव करून दिली. यशाच्या प्रगतीच्या वाटेवर चालणाऱ्या भारताला मागे ओढण्याचे प्रयत्न खूप जण करीत आहेत. परंतु आपण आपल्या देशाला प्रगतीच्या शिखरांवर नेऊन ठेवले पाहिजे. प्रत्येकाने आपआपल्या परीने सहकार्य केले पाहिजे. स्वतःशी व देशाबरोबर प्रामाणिक रहायला हवं. भारत देशाला उच्च स्थांनी जाण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही. भारतदेश महान आहे. आणि माझी खात्री आहे तुम्ही हे असंच नाव ठेवणार.

या कार्यक्रमांचे सुत्रसंचालक शिक्षक श्री.... याने केले. शिक्षिका सौ ... ने आभारप्रदर्शन केले.

05

MARKS	E	M	CM
Pg. 10 & 11	05	05	—

Q. No.

4) (रमा आणि प्रिया वर्गात बसले होते.)

रमा : ऐकलंस का प्रिया, एका मुलाने म्हणे भ्रमणध्वनी आणला होती शाळेत.

प्रिया : हो गं रमा! आणि सरांने म्हणे भ्रमणध्वनी काढुन घेतली व पालकांना बोलावले.

रमा : भ्रमणध्वनी तर आजच्या काळात खुप महत्वाची गोष्ट झाली आहे. माणसाच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे.

प्रिया : ते आहेच गं पण भ्रमणध्वनीच्या आहारी जाणे चुकीचे आहे.

रमा : काय नाही होत गं आणि भ्रमणध्वनीशिवाय माणूस राहू पण नाही शकत.

प्रिया : काय होत नाही - बापरे! भ्रमणध्वनीचे खूप वाईट परिणाम होतात आपल्यावरती.

रमा : काहीही असतं तुझं ना. सांग बघु तर.

प्रिया : मोबाईलवर एकटक बघत्याने डोळ्यांवर ताण पडतो व दृष्टी कमी होते. मानेचे अनेक आजार होतात. आपली ध्येय क्षमता कमी होते, सवय लागते आणि...

रमा : बस ..बस! कळलं मला. त्याने सुद्धा तर भ्रमणध्वनीचा लागलेल्या चटकेमुळ आणला होता भ्रमणध्वनी खूप वाईट

प्रिया : नाही गं! रमा भ्रमणध्वनी वाईट नाही आहे. फक्त आपण त्याचा व्यवस्थित वापर केला पाहिजे. याचा

Q. No.

५१ जीवावर आपण लांब असलेल्यांना पाहु शकतो, फोन लावु शकतो, आणि बरेच फायदे तर आहेत

रमा : हो गं बरोबर आहे तुझं आम्ही विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर केला पाहिजे.

प्रिया : कुठली गोष्ट वाईट नसते आपण त्याला वाईट बनवतो.

रमा : हो खरं आहे. घंटा वाजली पुस्तक बाहेर काढुया

04½

MARKS	E	M	CM
Pg. 12 & 13	04½	4.5	—

Q. No.

42

प्राणी बोलू लागले तर

मी माझ्या लहान भावाला कावळा आणि चिमणीची गोष्ट सांगत होती. लहान मुलांना गोष्ट सांगितल्या शिवाय ते काही खात नाही. रात्रीचं सुद्धा कुठल्या तरी प्राण्यांबद्दल गोष्ट सांगावी लागते. मला त्यांने अचानक विचारले "ताई, प्राणी खरंच बोलतात का?" तेव्हा माझ्या मनात विचार आला. प्राणी बोलू लागले तर...

कीती वेगळी पण नवल आहे ना. माणसाच्या मुखी शब्द येतात म्हणून त्याला माणूस म्हणतात. आणि जनावरांच्या तोंडातुन शब्द यायला लागले, ते बोलायला लागले तर आपण त्यांना काय म्हणायचे ? पण खरंच एका क्षणासाठी आपण मानुया की प्राणी बोलतात. प्राणी एकमेकांना साद घालीत बोलत आहे ही फार गंमतीशीर वाटे गोष्ट. चिमणी म्हणेल माया बाई कंटाळा आला आता आकाशात उडायचा. आकाशात तारे लावुन ठेवले या माणसांनी, त्यामुळे माझे कितीतरी मित्रांचा मृत्यु झाला. आकाशात नको ते धातु सोडुन प्रदुषण केले आणि श्वास घ्यायला ही त्रास होत आहे. मासा म्हणेल माझी पण तीच हालत आहे. पाण्यात आमच्यापेक्षा जास्त तर प्लास्टिक आहे. हे पोटात जाऊन माझे खुप साथीमेले. हे प्लास्टिक मध्ये अडकत व पाणी खावत. साप म्हणेल ही गरमी इतकी आहे की असं वाटतं घरातुन बाहेरच यायला नको ही भीषणता सहन होत नाही. जंगलाचा राजा म्हणेल आमची तर घरंच उद्ध्वस्त केली. आम्ही कुठे राहायचं आम्ही कोणाचा राजा म्हणून सांगायचे ? चित्ता म्हणेल मी तर काहीच मिळत नाही म्हणून रस्त्यांवर जातो मग माणसं मला घाबरतात मी हल्ला करणार की काय आणि मग जे लपाछुपी सुरु होते ती काय सांग.

Q. No.

42. असे सगळे प्राणी बोलायला लागतील आणि बोलतील ते फक्त माणसांबद्दल. माणूस ही त्यांची चर्चा करण्याची ठरलेली विषय असणार आणि त्यांच ते बरोबर आहे. माणसाने म्हणजे आपण झाडं कापली, स्वत:च्या स्वार्थासाठी जंगल नष्ट केली. जल प्रदुषण, वायु प्रदुषण, अशा अनेक प्रकारच्या समस्यांना आपण जन्म दिला. उंट, हत्ती, घोडा या सारख्या प्राण्यांचे हाल-हाल करतो. पैसे कमावण्यासाठी त्यांना मारलं जातं उपाशी ठेवलं जातं. अनेकांना प्राणी संग्रहालयात ठेवलं जातं. त्यांना जायबंदीच केलं जातं कोंबडी, बकऱ्या, डुक्कर या सारख्या प्राण्यांना मारून त्यांच मास खाल्लं जातं. स्वत:च्या मजेसाठी कितीतरी लहान प्राण्यांची शिकार केली जाती. जो व्यक्ती इतरांचा संसारात समस्या निर्माण करतो तो कधीही सुखी राहू शकत नाही.

आपल्याला सर्वात प्रथम झाडांची तोडी बंद करायला हवी. त्याने प्राण्यांचे नव्हे तर आपले ही नुकसान होणार. विनाकारण शिकार करणे थांबायला हवे. प्रत्येक प्राण्याला बोलता जरी नाही आले तरी त्यांना भावना आहेत त्यांचा भावनांचा आदर केला पाहिजे. त्यांचा संसारात आपण समस्या नको निर्माण करुयात आपल्याला पाप लागेल. आपली जबाबदारी बनते की हा निसर्ग आहे तसा तो इतर जनावरांसाठी ठेवला पाहिजे. प्रदूषण बंद करायला हवं. आणि जे आपल्या हातून झाले त्याला नीट केलं पाहिजे. हा निसर्ग आहे म्हणजे पूर्वी होता तसा, पुढच्या येणाऱ्या पिढीला देण्याची गरज आहे. प्राणी नष्ट झाले तर ह्या सृष्टीचा विनाश होईल. आणि त्याचबरोबर मानवजातीचा देखील अंत निश्चित आहे. आपण सारेजण एकत्र येऊन एक चांगलं विश्व बनवूया. या विश्वात प्राणी आणि माणसे एकत्र आनंदात, सुखात राहतील.

09/12

MARKS	E	M	CM
Pg. 14 & 15	09½	09	—

Q. No.

24. एकोणीस चौऱ्याहत्तर साली एका शिकाऱ्याने एक हकिकत लिहून ठेवली होती. एका शिकाऱ्याने त्या गेंड्यावर डझनभर बार टाकले तरीही तो जंगलात निघून गेला. संध्याकाळ झाल्याने तो शिकारी घरी निघून गेला. दुसऱ्यादिवशी सकाळी शिकारी परत गेला तो त्याला धक्काच बसला; जबर जखमी झालेला असुनही तो गेंडा दोन वाघांशी लढा देत होता. हा जखमी झाला आहे या खाऊन टाकू या विचारात आलेल्या वाघांना त्यांनी धडा शिकवला. एक वाघ रक्ताने माखलेला तर दुसरा वाघ जबर जखमी झाला होता. शेवटी शिकाऱ्याने बार घालून वाघाला पळवून लावले. आणि गेंड्याला मारुन टाकले.

04 Extra

23 संदर्भ: हे वाक्य 'रागिणी पुंडलिक' यांचा नेत्रदान या पाठातुन घेण्यात आले आहे हे वाक्य आशुने आईला उद्देशुन म्हटले होते

स्पष्टीकरण: संजू २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टला रक्तदान करतो. त्याचा ब्लडकार्डबरोबर नेत्रदानाचा फॉर्म आला होता आशुने मोठ्या उत्साहाने नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा त्याची आई त्याला ओरडते. तेव्हा वरील उद्‌गार काढत तो म्हणतो की अंध व्यक्ती उघड्या प्रकाशमय जगात तर जगतात पण अंधारात असतोत. त्यांना डोळे मिळाले तर दृष्टी काय असते हे तरी कळेल. त्य फक्त आपलाच विचार न करता इतरांचा विचार देखील केला पाहिजे. अशी उदातता आशुच्या स्वभावातून दिसुन येते आपल्याला।

04½ Extra

Q. No.

३. संदर्भ : वरील ओळी 'संजीवनी बोकील' यांचा 'माये गं माये' या कवितेतून घेण्यात आली आहे.
या ओळीत ग्रामीण भागातील मुलीची शिक्षणासाठी चाललेली धडपड व्यक्त केली
स्पष्टीकरण : या कवितेतील मुलीला शिक्षणाची फार ओढ आहे. पण घरच्या बिकट परिस्थितीमुळे तिच्यावर शाळा सोडण्याची वेळ आली आहे. ती आपल्या आईची समजूत काढते की माझी शाळा तोडू नकोस मी तुला कसल्याही खर्चात पाडणार नाही. गणवेश फाटला पण तोच घालून जायला तयार आहे. नको दप्तर, नको रिबिन, नको खायला पैसे असे ती म्हणते. या कवितेत शिक्षणासाठी चाललेली मुलीची धडपड दिसून येते.

04 Extra

MARKS	E	M	CM
Pg. 16 & 17			

Q. No.

MARKS	E	M	CM
Pg. 18			

Q. No.